**नि.क्र ३७ खालील आदेश**
**(पारित दि.४/०५/२०२२)**

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादीं नं १ ते ५ व ११ यांचेविरुध्द मनाई हुकुम करणेकरिता दाखल केलेला आहे.

२. वादीचे म्हणणे असे की, प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी नं १,२,४,५,६ व ७,११ यांना दाव्याचे समन्स व नोटीसची बजावणी झाली आहे. परंतु बजावणी झाल्यानंतरही प्रतिवादी यांनी गट नं ४७/१/ब या जमीनीमध्ये खडडे खोदण्याचे व सपाटीकरणाचे काम चालुच ठेवलेले आहे. त्यामुळे दावा जमीनीच्या स्वरुपात मोठया प्रमाणात बदल केले जात आहेत. वादी यांनी वेळोवेळी विनंती करुनही सदर बांधकाम थांबविलेले नाही. वादी हे सदर मिळकतीचे मालक आहेत हे ७/१२ वरुन सिध्द होते. तरिही प्रतिवादी वादीच्या संमतीशिवाय अनाधिकाराने त्या ठिकाणी बांधकाम करत आहेत. सदर ठिकाणी जमिनीवर बांधकाम केल्यास वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. प्रतिवादी दाव्याचे समन्स व नोटीस मिळुन देखील कोर्टात हजर राहण्यास टाळाटाळ करित आहेत. त्यामुळे प्रतिवादीं विरुध्द मनाई हुकुम पारित करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्रं १ ते ४ तर्फे नि.क्र ४३ प्रमाणे म्हणणे देण्यात आले. प्रतिवादींचे म्हणणे असे की, वादीने दि.२२/०४/२०२० रोजी सदरचे प्रकरण बोर्डावर घेउन प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी हे बाहेरगावी राहण्यास आहेत. त्यामुळे सदर प्रतिवादी दावा मिळकतीत कोणत्याही प्रकारे बांधकाम करत नाहीत. प्रतिवादींनी कोणतीही बेकायदेशीर कृत्य केलेले नाही. त्यामुळे वादींना प्रतिवादी विरुध्द मनाई मागता येणार नाही. प्रतिवादी व्यतिरिक्त इतर कोणी खोदकाम करित असल्यास अथवा बदल करित असल्यास त्यांना दाव्यात पक्षकार केलेशिवाय त्यांचेविरुध्द मनाई मागता येणार नाही. तसेच वादीने गट नंबर४७/१/ब या मिळकतीमध्ये खोदकाम चालु असेल तर त्याचे क्षेत्र किती व त्याची चतु:सिमा याबाबत दाव्यात अथवा अर्जात काहीही नमुद केलेले नाही. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे.

४. प्रस्तुत अर्जाचे व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द वाटप, ठराव व ताबा मिळणेकामी व मनाई करिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्ज वादीने प्रतिवादीं विरुध्द दावा मिळकत गट नंबर ४७/१/ब या मिळकतीसंदर्भात मनाई देण्यात यावी याकरिता दाखल केलेला आहे. या ठिकाणी हे ध्यानात घेणे जरुरीचे आहे की, वादीने दाव्यामध्ये प्रतिवादी नं २, ३ व ५ यांनी गट नंबर ४७/१/ब या शेतजमीनीच्या काही क्षेत्राचा ताबा वादी यांच्या परस्पर अन्य ति—हाईत इसमास दिल्याचे समजले आहे असे नमुद केले आहे. या ठिकाणी वादीने प्रतिवादींनी कोणाला जमीनीचा ताबा दिलेला आहे व कोणत्या उददेशासाठी तसेच कशाप्रकारे हस्तांतरण केलेले आहे याबाबत कोणताही स्पष्ट उल्लेख केलेला नाही. वादीने मोघमपणे प्रतिवादींनी अन्य ति—हाईत इसमास सदर मिळकतीचा ताबा दिल्याचे नमुद केलेले आहे. तसेच वादीचे म्हणणे असे की, सदर मिळकतीचा काही क्षेत्राचा ताबा प्रतिवादी यांनी अन्य ति—हाईत इसमास दिलेला आहे. परंतु वादीने सदर ति—हाईत इसमास याकामी पक्षकार केलेले नाही.

६. तसेच वादीने दाव्यामध्ये प्रतिवादी सदर मिळकतीवर बांधकाम करत आहेत असा स्पष्ट उल्लेख केलेला नाही. तसेच प्रस्तुत अर्जाचे पुष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र देखील दाखल केलेले नाही. अशा परिस्थितीत प्रस्तुत अर्जातील कथनांवर विसंबुन प्रतिवादीं विरुध्द मनाई हुकुम देणे उचित होणार नाही. प्रतिवादींचे म्हणणे असे की, दावा मिळकतीमध्ये गावदेवी आई शिरकाई व माता जानुबाई यांचे मंदिर आहे. प्रतिवादींच्या विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, सदर ठिकाणी मंदिराच्या जिर्नोध्दाराचे काम चालु आहे व सदर बांधकामास वादी विजय शंकर पडवळ यांनी तोंडी संमती दिलेली आहे. सदर कथनांच्या पुष्ठयर्थ प्रतिवादींनी मौजे राजघर गावचे सरपंच बाजीराव सिताराम पडवळ यांचे शपथपत्र दाखल केलेले आहे. या उलट वादीने साक्षीदार सुरेखा विजय पडवळ यांचे शपथपत्र दाखल केले आहे व त्यामध्ये साक्षीदाराने विजय पडवळ यांनी बांधकामास कधीही सहमती दिली नाही असे नमुद केलेले आहे. वादीने प्रस्तुत दाव्यामध्ये दावा मिळकतीवरिल पुजनाचे छायाचित्र दाखल केलेले आहेत.या ठिकाणी हे ध्यानात घेणे जरुरीचे आहे की, गट नंबर ४७/१/ब याचे ७/१२ चे अवलोकन केले असता, सदर मिळकतीचे छेत्र ८० गुंठे आहे. परंतु वादीने सदर मिळकतीमध्ये किती क्षेत्रात व कोणत्या बाजुस बांधकाम चालु आहे याबाबत कोणताही स्पष्ट उल्लेख केलेला नाही. अशा परिस्थीत वादीचे मोघम कथनावर विसंबुन मनाईचा हुकुम पारित करणे योग्य होणार

नाही.

७. या ठिकाणी महत्वाची बाब म्हणजे दाव्याचे व त्यासोबत दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडिलोपार्जित मिळकत असल्याचे दिसुन येते. त्यामुळे वादी व प्रतिवादी हे दावा मिळकतीचे सहहिस्सेदार आहेत. अशा परिस्थितीत दाव्याच्या या टप्यावर सह हिस्सेदाराच्या विरुध्द मनाई हुकुम देणे उचित होणार नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणामध्ये वादी क्रं १ ते ५ व ११ यांनी दावा मिळकतीचे हस्तांतरण करणार नाही अशी पुरसिस देखील दिलेली आहे. अशा परिस्थीमध्ये दाव्याचे स्वरुप व त्यातील मागणी ध्याानात घेता प्रतिवादीं विरुध्द मनाईचा हुकुम पारित करणे उचित होणार नाही. तसेच वादीने प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी विरुध्द नेमकी कोणती मनाई देण्यात यावी व कशा स्वरुपाचा मनाई हुकुम देण्यात यावा याबाबत देखील स्पष्ट उल्लेख केलेला नाही. त्यामुळे वरिल सर्व कारणमिमांसा ध्यानात घेता प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करणे उचित होईल. म्हणुन खालील अर्ज पारित करण्यात येते.

**आदेश**

प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

सही

दि.४/०५/२०२२

(एच.यु.यु.पाटील)
सह.दिवाणी न्यायाधीश,भोर,जि.पुणे.